जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड
# गदर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855



आक्रोष

बीड- महाराष्ट्र | साप्ताहिक | वर्षे 1 ले | अंक 57 वा | बुधवार, दि. 18 ते 24 डिसेंबर 2024 | टीसी- एमएएचएमआर/2023/52253 | पाने 4 | किंमत 2 रु |
BEED - MAHARASHTRA VICKELY | VOL 1 | issue 57 | tuesday, 18 To 24 DEC 2024 | TC- MAHMAR/2023/52253 | PAGE 4 | Rs. 2 रु |

# मुख्यमंत्र्यांनी बीड प्रकरण मनावर घे

## आरोपी कोणत्याही पक्षाच्या जवळचे असले तरी कारवाई होणारच




बीड प्रतिनीधी :

बीड जिल्ह्यात केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा मुद्दा हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत उपस्थित करण्यात आला. यातील आरोपी कोणत्याही पक्षाच्या जवळचे असले तरी कारवाई करण्यात येईल. तसेच प्रकरणाचा तपास सीआयडीमार्फत करण्यात येईल व तपासात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिषदेत दिली.विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या मुद्द्यावरून स्थगन प्रस्ताव मांडला होता. दानवे यांनी या प्रकरणातील आरोपी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष असल्याचा मुद्दा मांडला. यावर फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. सरकारने ही घटना अतिशय गांभीर्याने घेतली आहे. या प्रकरणात हलगर्जी करणाऱ्या पोलिस निरीक्षकाला सक्तीच्या रजेवर पाठविले आहे तर पोलिस उपनिरीक्षकाला निलंबित केले आहे. फरार आरोपींना शोधण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच सीआयडीकडे हे प्रकरण देण्यात आले असून, त्यांची 'एसआयटी' मार्फत चौकशी करण्यात येईल. ज्या पोलिसांनी कामचुकारपणा केला असेल त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## संतोष देशमुखचा मुडदा पाडणाऱ्यांचा आका शोधा : धस

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आर्थिक व्यवहारातून झाल्याचा मंत्री धनंजय मुंडे यांचे मत भाजप आमदार सुरेश धस यांनी जोरकसपणे फेटाळून लावले आहे. संतोष देशमुख यांची हत्या आर्थिक व्यवहारातून झाली नाही. मी सुद्धा त्याच जिल्ह्यात राहतो. त्यामुळे त्याचा मुडदा पाडणाऱ्यांचा आका शोधा, त्यांचे शागीर्द शोधा, असे ते या प्रकरणी धनंजय मुंडे यांना घेरताना म्हणालेत. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांनी सरपंच संतोष देशमुख यांची हत्या जातीय द्वेष नव्हे तर आर्थिक व्यवहारातून झाल्याचा दावा केला होता. त्यांचा हा दावा भाजप आमदार सुरेश यांनी मंगळवारी नागपुरात पत्रकारांशी संवाद साधताना फेटाळून लावला. ते म्हणाले, बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावच्या संतोष देशमुख नामक तरुण सरपंचाची निघृण हत्या झाली. त्याचे मारेकरी अद्याप फरार आहेत. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी सांगितले आहे की, मारेकरी मोबाइल व गाडी बार्शीजवळ सोडून पसार झालेत. विमा कंपन्यांबाबत काही प्रकार होता. त्यात डेटाचा वापर होतो. यांचे कुठे व कुणाला कॉल झाले? काही ट्रॅन्झेंक्शन झालेत का? संतोष देशमुख तिसऱ्यांदा सरपंच झाला होता. त्यामुळे त्याचा मुडदा पाडणाऱ्यांचा आका शोधला पाहिजे. पोलिसांवर कुणाचातरी दबाव असल्याचा संशय आहे. त्यामुळे त्यांचा शागीर्द कोण आहे हे शोधावे. या प्रकरणी दिरंगाई होता कामा नये, असे सुरेश धस म्हणाले.



सरपंच देशमुख यांना किडनॅप करण्यात आले असल्याची माहिती पोलिसांना होती. पोलिसांना माहीत असून देखील पोलिस त्या ठिकाणी गेले नाहीत. संतोष देशमुख यांचा मृत्यू झाल्यानंतरच, त्यांची निघृण हत्या झाल्यानंतरच पोलिस ॲक्शनमध्ये येत असेल तर राजकीय हत्यासत्र या महाराष्ट्रात या ईव्हीएममधून निवडून आलेले सरकार करत आहे का? ही घटना देखील येथे निदर्शनास येत असल्याची शंका आहे.
– **नाना पटोले**



## वाल्मिक कराडांवर खंडणीचा गुन्हा दाखल, पण अद्याप कारवाई नाही!

ज्या पवनचक्की कंपनीच्या कार्यालय परिसरात झालेल्या वादावरून सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली त्या पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्याकडे २ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांच्यासह तिघांविरोधात केज पोलिस ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल झाला आहे. वाल्मिक कराड (रा. परळी), विष्णू चाटे (रा. कौडगाव, ता. केज) व सुदर्शन घुले (रा. टाकळी, ता. केज) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. सुनिल केदू शिंदे (वय ४२, रा. नाशिक ह. मु. बीड) असे फिर्यादि देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव आहे. गुन्हा दाखल झाला असला तरी अद्याप याप्रकरणी कारवाई करण्यात आलेली नाही.

## वाल्मिक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाईंड, त्याला अटक करा : रोहित पवार




बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाची एसआयटी नव्हे तर न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. मी या प्रकरणात कोणत्याही मंत्र्याचे नाही, तर खंडणीखोर वाल्मिक कराडचे नाव घेत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येमागे वाल्मिक कराडचा हात असल्याचा आरोप गावकरी करत आहेत.त्यामुळे त्याला अटक झालीच पाहिजे, असे ते म्हणालेत.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात स्पष्ट भूमिका



## दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही : खा. सोनवणे

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचे पडसाद राज्यभरात उमटत असताना बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी हा मुद्दा लोकसभेत उपस्थित केला आहे. संतोष देशमुख यांच्या क्रूर खून प्रकरणातील सर्व मारेकऱ्यांना अटक करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी खासदार सोनवणे यांनी संसदेत केली. "बीड जिल्ह्यातील हे प्रकरण देशातील कायदा व सुव्यवस्थेवरील मोठा आघात आहे आणि दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही," अशी भूमिकाही बजरंग सोनवणे यांनी घेतली आहे.





## अंबादास दानवेंनी घेतले वाल्मिक कराडचे नाव

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही परळीतील दहशतवादाचा निपटारा करण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले की, बीड परळी येथील दहशतवाद निपटून काढावा लागेल. एखादा पालकमंत्री बीडला पाठवून तेथील कायदा सुव्यवस्था नीट केली पाहिजे. वाल्मिक कराड यांच्यावर गुन्हा दाखल झाला. त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. हे स्थानिक नेत्यांच्या सहकार्याशिवाय होऊ शकते का? या लोकांनी मतदारांना मतदान केंद्रावरही जाऊ दिले नव्हते, असे ते म्हणाले.

## बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीवर आळा घाला : संदीप क्षीरसागर

सरपंच संतोष देशमुख यांचा दिवसाढवळ्या खून करण्यात आला आणि अजूनही यामागील मास्टरमाईंड सापडलेला नसल्याचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे. यासंदर्भाच्या तक्रारी आपण वारंवार करत आहोत. त्या व्यक्तीचे नाव वाल्मीक कराड असल्याचे देखील संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे. आमदार म्हणून आपल्याला एक बॉडीगार्ड मिळतो तर एका गुन्हेगारी व्यक्तीला दोन बॉडीगार्ड कसे मिळतात? असा प्रश्न क्षीरसागर यांनी उपस्थित केला. त्याच्यावर खंडणीचा गुन्ह्या नोंदवण्यात आला असून वास्तविक हा 302 मध्ये कट रचला गेला होता. त्यामध्ये अद्यापही वाल्मीक कराड याचे नाव नसल्याचा आरोप देखील क्षीरसागर यांनी केला आहे.





## गुन्हेगारांना फाशी द्या : आमदार नमिता मुंदडा

संतोष देशमुख हे दोन वेळा सरपंच म्हणून निवडून आलेले आहे. संतोष देशमुख यांनी खूप चांगले काम केले आणि ते चांगले व्यक्ती होते. लोकप्रतिनिधी असून देखील राष्ट्रीय महामार्गावर अपहरण करून त्यांचा खून करण्यात आला. हे सर्व अतिशय भीतीदायक आहे. त्यांचे डोळे जाळण्यात आले आणि निघून खून करण्यात आला. या घटनेला आठ दिवस झाले आहेत. तरी अद्याप या प्रकरणात सात आरोपी असताना, त्यातील केवळ तीनच आरोपी अद्याप पकडले गेले आहेत. त्यामुळे या प्रकरणातील इतर सर्व आरोपींना पकडून आणि त्यांना फाशीची देण्यात यावी. या विरोधामध्ये बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात संताप आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात लक्ष घालून यातील दोषींना कडक शिक्षा करण्याची मागणी देखील नमिता मुंदडा यांनी केली आहे.

## व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल जनतेत एकच खळबळ

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले आणि केजचे पोलिस उपनिरीक्षक यांची केज शहरातील एका हॉटेलमध्ये भेट झाल्याचा सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. हत्येच्या घटनेपूर्वी पोलिस उपनिरीक्षक आणि सुदर्शन घुले यांची केजमधील वसंत विहार उडप्पी हॉटेलमध्ये भेट झाली होती, असे या फुटेजमधून स्पष्ट होत आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून जनतेत एकच खळबळ उडाली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात केज पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील यांच्यावर आधीच निलंबनाची कारवाई करण्यात आली. दरम्यान संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेपूर्वी पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील यांनी आरोपी सुदर्शन घुले याची भेट का घेतली? पोलिस आणि आरोपींच्या संगनमतानेच संतोष देशमुखांच्या हत्येचा कट रचला होता का असे प्रश्न बीड जिल्ह्यातील नागरिकांमधून व्हिडिओ पाहिल्यानंतर उपस्थित होत आहेत. तर यामधील खरा काय प्रकार तपासाअंती बाहेर येण्याची प्रतीक्षा आहे.

जाहीरात व बातम्यांसाठी संपर्क +91 97635 21855

सा. बीड गादर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855



बुधवार, दि. 18 ते 24 डिसेंबर 2024

# स्व. मुंडे साहेबांचा यांचा बीड जिल्हा दोन कॅबिनेट मंत्रीपदाने शोभला पंकजाताईंना दुसऱ्यांदा तर धनुभाऊना तिसऱ्यांदा मंत्रिपदाची माळ

## ३३ आमदारांनी कॅबीनेट तर ६ आमदारांनी घेतली राज्यमंत्री पदाची शपथ

**बीड : प्रतिनिधी**

२०१४ आणि २०१९ साली पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे विधानसभा निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात लढले होते. २०१४ साली पंकजा मुंडे विजयी झाल्या होत्या तर २०१९ मध्ये धनंजय मुंडे यांनी गुलाल उधळला होता. परंतु राज्यातील राजकीय घडामोडींमुळे हे दोघेही आता एकत्र आले. दोघेही मोठे नेते असल्याने त्यांना नव्या मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. आतापर्यंत दोघेही विरोधी बाकावर असल्याने सोबत कधीही मंत्रिपद मिळाले नव्हते. परंतु आता दोघेही महायुती असल्याने पहिल्यांदाच बहीण-भावाला सोबत मंत्रिपद मिळाले आहे. आता जिल्ह्याचे पालकत्व कोणाकडे जाणार याकडे लक्ष लागले आहे.

राज्यात राजकीय घडामोडी झाल्यानंतर पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे एकत्र आले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत या बहीण- भावाने उमेदवार असताना पहिल्यांदाच एकमेकांचा प्रचार केला. यात पंकजा यांना अपयश आले, तरी त्यांना नंतर विधान परिषदेवर पक्षाने संधी दिली. तर, धनंजय मुंडे यांनी आपल्या जनसंपर्काच्या बळावर विक्रमी १ लाख ४१ हजार मतांनी गुलाल उधळला. सलग दोन मंत्रिपदांचा अनुभव असलेल्या धनंजय मुंडे यांना पक्षाने तिसऱ्यांदा जबाबदारी दिली. या दोघा बहीण-भावांनी रविवारी नागपूर मंत्रिपदाची शपथ घेतली यावेळी समर्थक यांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी केली. तसेच बाले किल्ला बाले किल्ला मुंडे साहेबांचा बाले किल्ला असा आवाज घूमला.



### प्रकाश दादा, सुरेश अण्णा यांच्या पदरी निराशा

मुंडे-बहीणभावासोबतच आष्टीतील भाजपचे आ. सुरेश धस आणि माजलगावचे राष्ट्रवादीचे आ. प्रकाश सोळंके यांचीही नावे मंत्रिपदासाठी चर्चेत होती. त्यांच्या समर्थकांनी पक्षश्रेष्ठींकडे तशी मागणीही केली होती. एकाच घरात दोन मंत्रिपदे मिळणार नाहीत, त्यामुळे सुरेश धस यांना अपेक्षा होती तर आपली शेवटची टर्म असल्याने मंत्रिपद मिळेल, अशी अपेक्षा सोळंकेंना होती. परंतु दोघांच्याही पदरी निराशा आली.

### पंकजाताईंचा संयम

२०१९ च्या विधानसभेच्या निवडणूकीत पंकजाताईंचा पराभव झाला, २०१९ ते २०२३ पर्यंत त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला, राजकारणात काही मिळाले नाही तर थेट पक्ष बदलणारे अनेक नेते आहेत, मात्र मोठ्या उंचीच्या नेत्या असतानाही मोठ्या अडचणीचा सामना करत पंकजाताई कधीच डगमगल्या नाहीत, सलग पाच वर्ष त्यांनी संयमच राखला आज त्याच संयमाचे फळ पंकजाताईंना कॅबिनेट मंत्री पदी वर्णी लागल्यानंतर मिळाले आहे.



## किल्लेधारुर येथे स्वामी हरिहरानंदभारती यांची शिवकथा

**धारूर प्रतिनीधी:**

किल्ले धारूर शहरात उदयनगर भागात महीला मडळाचे वतीने स्वामी हरिहरानंदभारती मांचे श्री शिवकथेचे आयोजन १८ ते २५ डिसेबर दरम्यान आयोजन करण्यात आले असून ह. भ. प. प्रकाश महाराज साठे याचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाने २५ डिंसेबर रोजी या कथेचा समारोप होणार आहे भावीक भक्तानी याचा लाभ घ्यावा असे अवाहण उदयनगर महीला मंडळाचे वतीने करण्यात आले आहे. शहरातील उदयनगर भागातील महीला मंडळाचे वतीने १८ त २५ संगितमय श्री शिवकथेचे आयोजन करण्यात आले असून स्वामी हरिहरानंद भारती याचे अमृतवाणीतून कथा सांगण्यात येणार असुन रोज दुपारी २ ते ५नशिवकथा होणार असून ५ ते ६ या दरम्यान शिवपाठ होणार आहे तर २५डिंसेबर रोजी ह. भ. प प्रकाश महाराज साठे यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या सर्व कार्यक्रमाचा लाभ भावीक भक्तानी घ्यावा असे अवाहण संयोजक महीला मंडळाचे वतीने करण्यात आले आहे.

# बाहेगव्हाण येथे अखंड हरिनाम सप्ताला सुरुवात

## महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकाराचे होणार कीर्तन

**वडवणी/प्रतिनिधी -:**

प्रथी वर्षीप्रमाणे मार्गशीष महिन्यात गेल्या अनेक वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह बाहेगव्हाण येथे होत असून याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले, श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज व वारकरी संप्रदायाच्या सकल साधु संताच्या कृपाने श्रीमद् भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व किर्तन होणार आहे वर्ष ३५ वे कृ. ०१ शके १९४६ सोमवार दि १६/१२/२०२४ ते मार्गशीर्ष कृ. २७ शके १९४६ सोमवार दि २३/१२/२०२४ या कालावधीमध्ये होत आहे अखंड हरिनाम सप्ताह मौजे दि१६/१२/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा.कलशारोहण : ह.भ.प.शांतीब्रम्हे नवनाथ महाराज,ह.भ.प. भगवान महाराज राजपुत होणार आसुन श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प. भागवताचार्य निरंजन भाईजी महाराज शिंदे यांचे भागवत कथा होणार आहे तर ज्ञानेधरी पारायण नेतृत्व ह.भ.प. हनुमंत महाराज मस्के हे करणारआहेत तसेच निर्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण १० ते १२ गाथा भजन १ ते ५ संगीत भागवत कथा ५ ते ६ हरिपाठ ९ ते ११ हरिकीर्तन व नंतर हरीजागर



होईल. तसेच कीर्तनकार म्हणून दि. १६/१२/२०२४ रोजी श्री. ह.भ.प. गणेश महाराज वारंगे,दि १७/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प. रामराव महाराज ढोक, दि १८/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प. हनुमान महाराज डांबे भागवताचार्य दि १९/१२/२०२४रोजी श्री.ह.भ.प. विलास महाराज गेजगे,दि. २०/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प.बाळू महाराज गिरगावकर, दि.२१/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प. नामदेव महाराज लबडे,दि.२२/१२/२०२४ रोजी श्री.ह.भ.प. सागर महाराज बोराटे, यांचे संध्याकाळी ९ ते११ कीर्तन होईल हेत व दि २३/१२/२०२४ रोजी सकाळी ११ते १ या वेळेत स्वामी अमोलनंदजी महाराज गिरी यांचे काल्याचे किर्तन होणार आहे त्यानंतर महाप्रसादाचा होईल तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहचा लाभ घ्यावा तसेच विशेष मार्गदर्शक: म्हणून ह.भ.प. तात्यासाहेव महाराज मस्के ह.भ.प. डॉ. गोविंद मस्के हे असणार आहेत तसेच सप्ताहाचे यजमान तुळशीराम बळीराम मस्के, शहादेव बळीराम मस्के, अशोक रंगनाथ मस्के, लक्ष्मणराव एकनाच शेळके, ज्ञानेश्वर नवनाथ मस्के, कल्याणराव शाहूराव मस्के, हनुमान एकनाथ मरके, सुरेश राकिसन मस्के, बाबुराव विठ्ठलराव मस्के, अशोक दगडूबा जाधव, शिवाजी अच्युतराव डोरले, शिवदास रामकिशन मस्के, गोरख लक्ष्मणराव गायकवाड, अर्जुन रावसाहेब मस्के, अर्जुन सखाराम मस्के, अशोक नागनाथ कदम, कृष्णा बद्रीनाथ कदम, विकास बाळू कसबे, नवनाथ नारायण मस्के, रामनाथ मुकिंदा मस्के, भागवत बाबुराव मस्के, भरत गिरमाजी नागवे, मधुकरराव किसन चव्हाण, तानाजी दादाराव डांबे, बहादेव अभिमान खाडे, बाबासाहेब दगडूबा जाधव, हनुमंत रावसाहेब मरके, जयसिंग नागनाथ मस्के, भागवत आश्रुबा कदम हे असणार आहेत

# परभणीतील घटनेच्या निषेधार्थ जिल्हा बंद बीड, माजलगाव, धारूर,गेवराई, वडवणीमध्ये रॅली

**बीड प्रातिनिधी:**

परभणी येथे संविधानाची झालेल्या विटंबनेच्या निषेधार्थ अंदोलनात सहभागी झालेल्या कायद्याचे तिसऱ्या वर्षाचे शिक्षण घेत असलेल्या भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यास पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशनच्या काळात अटक करून पोलिस कोठडी घेऊन नंतर न्यायालयीन कोठडीत रवानगी केले. त्याचा रविवार (ता. १५) रोजी पहाटे संशयास्पद मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ महाराष्ट्र बंदचे आवाहन केले होते. या बंदला बीड, गेवराई, माजलगाव, वडवणी, उमापूर यासह जिल्हाभरात प्रतिसाद मिळाला.

सोमवार रोजी गेवराई शहरातून निषेध रॅली काढून निषेध व्यक्त करत पोलिस ठाणे गेवराई यांना विविध मागणीचे निवेदन देण्यात आले. तालुक्यातील ग्रामीण भागातील बाजारपेठ बंद ठेवण्यात आले.वडवणी, धारूर कडकडीत बंद पाळण्यात आला असून शहरातून मोटारसायकल रॅली काढून घटनेचा निषेध व्यक्त केला आहे. यावेळी प्रचंड घोषणाबाजी करत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. बंदला व्यापाऱ्यांनी सकाळपासूनच उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. भीमसैनिक सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी यांना न्याय द्यावा. आणि भीमसैनिकावरील गुन्हे पाठीमागे घेण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बंदला माजलगाव शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आपले व्यवहार कडकडीत बंद ठेवले. दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सर्व अनुयायांनी एकत्रित होत सदरील मृत्यूस जबाबदार असणाऱ्या पोलिस प्रशासनाचा निषेध व्यक्त केला..




# धारूर तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा

## अवकाळी पाऊस, गारपिटीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अडीच कोटीचा निधी ; डीबीटीमार्फत होणार वाटप

**धारूर प्रतिनीधी**

धारूर तालुक्यामध्ये गत उन्हाळ्यात एप्रिल - मे महिन्यामध्ये गारपीट तसेच अवकाळी पावसामुळे २ हजार १६० शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले होते. यासाठी शासनाने भरपाई देण्याचे जाहीर करण्यात आले होते. धारूर तालुक्यासाठी २ कोटी ५१ लाख ३० हजार ४३१ रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. या निधीचे वाटप करण्यासाठी शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया सुरू झाली.

धारूर तालुक्यात ११ एप्रिल रोजी अवकाळी पावसासह मोठ्या प्रमाणात गारपीट झाली होती. या गारपिटीमुळे धारूर, आवरगाव, कोळपिंपरी, पांगरी, हसनाबाद, आसोला, चोरंबा, अरणवाडी, गोपाळपूर, चारदरी, घागरवाडा, मैंदवाडी, थेटेगव्हाण, सोनीमोहा, जहागीरमोहा, चोंडी, प. पारगाव, आंबेवडगाव, गावंदरा, कारी, भोगलवाडी यासह ५३ गावात दोन ते तीन टप्प्यात गारपीट झाली होती. या गारपीट मुळे शेतकऱ्यांच्या आंबा, डाळिंब, चिंच केळी, पेरू, पपई, मोसंबी या फळफिकासह मिरची, टोमॅटो, कांदा, तुती, टरबूज यासह भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाली होते. २१ हजार १६० शेतकऱ्यांचे पिकाचे

> धारूर तालुक्यातील मोठ्या प्रमाणात शेतकरी ऊस तोडणी साठी सहा महिने कालावधीसाठी राज्यात तसेच राज्या बाहेर स्थलांतरित झाले आहेत. केवायसी केल्याशिवाय त्यांना अनुदान मिळणार नाही. केवायसी करण्यासाठी त्यांना स्थलांतरामुळे अडचण येणार आहे. यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात अनुदानापासून वंचित राहू शकतात..



नुकसान झाली होते. तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक यांच्यामार्फत पंचनामे करण्यात आले होते. त्यानुसार शासनाने शेतकऱ्यांना अनुदान जाहीर करण्यात आले होते. जाहीर करण्यात आलेले अनुदान तालुक्यासाठी नुकतेच उपलब्ध झाले आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या अनुदानामध्ये शासनाने वाढ करण्यात आली आहे. ती वाढ २ हेक्टर वरून ३ हेक्टर पर्यंत मर्यादा केली आहे. यामध्ये जिरायती पिकासाठी १३ हजार ६०० तर बागायतीसाठी २७ हजार, बहुवार्षिक फळ पिकासाठी

३६ हजार हेक्टरी अनुदान देण्यात आले आहे. एप्रिल महिन्यामध्ये बागायती ३९१ हेक्टरचे तर फळ पिकांमध्ये ३८४ हेक्टर नुकसान झाले होते. या महिन्यातील नुकसाणी साठी २ कोटी ४४ लाख २३३० तर मे महिन्यातील नुकसानीचे ७२ लाख ८१०० एवढी मागणी करण्यात आली होती. त्या नुसार तालुक्यासाठी ५३ गावांमध्ये २ कोटी ५१ लाख ३० हजार४३१ रुपये एवढा निधी मंजूर झाला आहे. हा निधी वाढण्यासाठी डीबीटी मार्फत शेतकऱ्यांची ही केवायसी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या खात्यावर सदरील निधी वर्ग करण्यात येणार आहे.

# पंकजाताई धनुभाऊनी कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेताच वडवणीत आंनदोत्सव

## नगरसेवक सचिन सानप सह मित्र परिवाराच्या वतीने फटाक्यांची आतिषबाजी

**वडवणी प्रतिनीधी**

महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर काल वार सोमवार रोजी नागपुर येथे कॅबिनेट मंत्र्याचा शपथविधी सोहळा पार पडला. यावेळी आ. धनंजय मुंडे व आ. पंकजाताई मुंडे या बहिण भावाने सोबतच कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतल्या नंतर वडवणी शहरात नगरसेवक सचिन सानप सह मित्र परिवाराच्या वतीने तोफा व फटाक्याची अतिषबाजी करत गुलालाची उधळण करून आनंद उत्सह साजरा करण्यात आला आहे.

सत्य परेशान हो सकता है पराजित नही या म्हणीनुसार ना. मुंडे बहिण भावाने काल महायुतीच्या मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्र्याची एकच वेळी शपथविधी घेतला असून हि बाब जिल्ह्यासाठी आनंदद्याई आहे. काल नागपुर येथे शपथविधी सोहळा साजरा होत आसताना पंडितराव मुंडे शपथ घेतो कि,..... मी पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे शपथ घेते कि..... असे शब्द कानी पडताच वडवणी शहरात नगरसेवक सचिन सानप यांच्यासह मित्र परिवाराच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी ना. मुंडे बहिण भावाच्या जयजयकार घोषणा देत तोफा व फटाक्याची प्रंचड अतिषबाजी करत गुलालाची उधळण करून आनंद उत्सह साजरा



करण्यात आला आहे. यावेळी नगरसेवक सचिन सानप, युवा नेते अमरशेठ मस्के, उपसरपंच विकास नेहरकर, सरपंच दिनेश नाईकवाडे, नंदराज मुंडे, किरण कुमार तिडके, अमर भैया तिडके, दिलीप रोकडे, रामधन नागरगोजे, प्रज्वल उजगरे, अजिंक्य उजगरे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855

सा. बीड
# गदर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा
संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855



बुधवार, दि. 18 ते 24 डिसेंबर 2024

# जालना जिल्ह्याला मंत्रिपदाचा चकवा पुन्हा नशिबी बाहेरचा वाढपी पालकमंत्री...

## मराठा आरक्षणाचा केंद्रबिंदू असलेल्या जालना जिल्ह्याचा फडणवीस-शिंदेंनी केला करेक्ट कार्यक्रम

**जालना प्रतिनिधी :**

जालना जिल्ह्यात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पेटलेल्या आंदोलनामुळे महायुती सरकारच्या विरोधात प्रचंड वातावरण असतानाही महायुतीला मिळालेल्या दमदार यशानंतर जालना जिल्ह्याला मंत्रिपद लाभेल, अशी आशा जिल्हावासीयांना होती. मात्र पदरी निराशा पडली विशेष म्हणजे जिल्ह्यातील महायुतीचे सर्वच्या सर्व म्हणजे भाजपचे ३ आणि शिवसेनेचे २ असे ५ आमदार निवडून आले. जिल्ह्यातील लोकांनी महायुतीला महाकौल दिला असला तरी मंत्रीपदे देतांना काही जिल्ह्याला तीन-तीन, चार- चार तर जालना जिल्ह्याला मंत्रीपद न देता चकवा दिला आहे. मराठा आरक्षणाचा केंद्रबिंदू असलेल्या जालना जिल्ह्यात निवडूण आलेल्या आमदारा पैकी मंत्री पद सांभाळणारा सक्षम आमदार नाहीं का ? असा सवाल नागरीक व्यक्त करत त्यांच्यातून नाराजीचा सुर निघत आहे.

जिल्ह्यातील स्थानिकचा मंत्री, पालकमंत्री असला तर प्रशासनावर वचक असतो, समस्या गतीने मार्गी लागतात. बाहेरचा पालकमंत्री असला तर तो केवळ नियोजन मंडळाच्या बैठका आणि वर्षातून दोनदा झेंडावंदन करण्यासाठीच येत असल्याने जिल्ह्याचा अपेक्षित विकास होत नाही. बाहेरच्या पालकमंत्र्याला या जिल्ह्याच्या विकासचं तसेच बाकी लोकांचं काय चाललं, काय हवं याचं काही देण- घेण नसतं. कोणीही यावं आणि टपली मारून जावं असा हा प्रकार असतो. स्थानिकचा मंत्री असल्यावर वेगळी परिस्थिती असते. त्याचा प्रशासनावर कंट्रोल असतो. जिल्ह्यातील महत्वाच्या समस्या मांडल्या जातात, त्या लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न होतात. लोकांनी महायुतीला इतकं भरभरुन दिलं. जसं माल जास्त आला तर भाव पडतेत अगदी तसच मंत्रीमंडळाच झालं आहे. काठावर बहुमत असतं तर सरकारने एवढी शेखी मिरवली असती का? एवढी सत्वपरिक्षा पाहीली असती का? अनेकांचा करेक्ट कार्यक्रम केला असता का? मतदारांनी महायुतीला दिलेल्या महाकौलाचा अपमान करण्याची हिंमत शिंदे फडणविसांमध्ये आली असती का? असे अनेक प्रश्न जालना जिल्ह्यातील महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे असलेल्या मतदारांना सतावत असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागणार आहेत.







### डोळे टीव्हीकडे, कान फोनवर...

रविवारी मंत्रिमंडळ विस्तार असल्याने महायुती पदाधिकाऱ्यांना मोठी अशा लागून होती. सकाळपासूनच त्यांच्या नजरा टीव्हीवर येणाऱ्या नावाकडे होत्या. दुसरीकडे, आपल्या नेत्याचे नाव झळकत नसल्याने कानही फोनाफोनीत बिझी होते.

### पालकमंत्री भाजपचा की शिवसेनेचा ?

महायुतीची सत्ता असताना जिल्ह्याला आयात पालकमंत्री हे भाजपचे राहिले आहेत. आता यावेळी बाहेरचे पालकमंत्री असणार, हे निश्चित असेल तरी ते सेनेचे असतील की भाजपचे, याची उत्कंठा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना लागली आहे.

### सत्ता असूनही पदाधिकारी निराश

मराठा आरक्षणामुळे जालना जिल्हा राज्यातील राजकारणात कायम चर्चेत होता. लोकसभा निवडणुकीत भाजपाचे जेष्ठ नेते माजी मंत्री रावसाहेब दानवे यांना पराभव पत्करावा लागल्याने विधानसभा निवडणुकीत जिल्ह्याला झुकते माप देण्यात येइल अशी अपेक्षा होती. या पार्श्वभुमीवर गेल्या काही दिवसापासुन शिवसेनेचे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, भाजपाचे माजी मंत्री बबनराव लोणीकर, भोकरदनचे आ. संतोष दानवे बदनापुरचे आ. नारायण कुचे यांची नांवे चर्चेत होती. भाजपाकडुन माजी मंत्री बबनराव लाणीकर अथवा आ. संतोष दानवे यांच्या पैकी एकास तर शिवसेनेकडुन अर्जुनराव खोतकर यांचे नांव निश्चीत समजले जात होते. पदाधिकाऱ्यांना तर आपलेच आमदार मंत्री बनतील, अशी खात्री वाटत होती. मात्र, चकवा बसल्याने ही खात्री बारगळली अन पदाधिकारी निराश झाले.

### जालना जिल्ह्यात एकही आमदार मंत्री पदा लायक नाहीं ?

**जालना जिल्ह्याला मंत्री पदापासून डावलण्यात आले. याच्या प्रतिक्रया जनमानसात प्रतिक्रिया उमटायला सुरुवात झाली. जालना जिल्ह्यात एकही आमदार मंत्रिपदाच्या लायक नाही का असाच प्रश्न जिल्ह्यातील जनतेला पडला आहे. त्यातच परतूर मतदार संघातून भाजपाचे विजयी शिलेदार आमदार बबनराव लोणीकर यांनाही मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने परतूर मतदार संघातून नाराजीचा सूर उमटत आहे. सोशल मिडीयावर विविध व्हिडीओ, इमेजेस व्हायरल होत आहे. या व्हायरल इमेजेस मधून 'एवढ्या बहुआयामी व्यक्तीमत्त्वाला मंत्रीपदापासून का बरं डावललं ?' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**



## शॉर्टसर्किटमुळे तुरीचे पीक जळाले
### ७० हजार ते एक लाख रुपयांपर्यंतचे नुकसान

**मंठा प्रतिनीधी**

तालुक्यातील तळतोंडी येथील नागेश नारायणराव कुलकर्णी यांच्या शेतात शॉर्टसर्किटमुळे आग लागून तीन एकर शेतातील तूर व जनावरांचा चारा जळून खाक झाला. सोमवारी सकाळी घटना घडली. आगीत शेतकऱ्यांचे लाख रुपयाचे नुकसान झाले. महावितरणने नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांने केली आहे.

याप्रकरणी शेतकरी नागेश कुलकर्णी यांनी महावितरण कार्यालयात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मौजे तळतोंडी शिवारातील गट क्रमांक ४६ मधील तीन एकर तुरीचे पीक आहे. त्यावरून अकरा केव्हीच्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्या गेल्या आहेत.

या तारातून शॉर्टसर्किट होऊन त्यातून ठिणग्या उडाल्या. त्या तुरीच्या झाडावर पडल्या. त्यामुळे तुरीच्या शेतामध्ये आग लागून तीन एकरच्या पिकाची राख झाली असून ७० हजार ते एक लाख रुपयांपर्यंतचे नुकसान झाले सल्याचे कुलकर्णी यांनी निवेदनात म्हटले आहे. वीज वितरणच्या भोगळ कारभारामुळेच आग लागली असल्याने वीज वितरणने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी नागेश कुलकर्णी यांनी केली आहे. यादरम्यान महसूल व पोलिस ठाण्यात या प्रकरणी कळविले असल्याची माहिती देखील कुलकर्णी यांनी दिली. महावितरणच्या वीज तारांमुळे काही भागात ऊस जळाल्याच्या तक्रारी यापूर्वी अंबड व घनसावंगी तालुक्यात शेतकऱ्यांनी केल्या आहेत.

## बंजारा ब्रिगेडच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी अर्जुन नायक यांची फेरनिवड

**परतूर : प्रतिनिधी**



तालुक्यातील श्रीष्टी तांडा येथील रहिवाशी अर्जुन नायक यांची बंजारा ब्रिगेडच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी फेरनिवड करण्यात आली आहे.

बंजारा ब्रिगेडच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदावर कार्यरत असतांना संघटनात्मक क्षेत्रात केलेल्या कामाची दखल घेत फेरनिड करण्यात आली असल्याचे पत्र प्रदेश अध्यक्ष राहुल राठोड यांनी दीले. प्रदेश कार्यकारिणीवर काम करण्याची संधी संघटनेने अर्जुन नायक यांना उपलब्ध करून दिली आहे. बंजारा शिक्षण सेवा अभियानाचे राष्ट्रीय प्रचारक रमेश बापू महाराज, समन्वयक भरत पवार, प्रदेशाध्यक्ष मुकेश पवार यांच्या शिफाशीवरून बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांनी अर्जुन नायक यांची नियुक्ती केली आहे. आगामी काळात संघटनेची बांधणी करण्यासाठी प्रदेश कार्यकारिणी आणि विभाग, जिल्हा तसेच तालुका कार्यकारिणीशी समन्वय साधून संघटनेची पुढील धेय्य धोरणे राबवावित तसेच बंजारा समाजाला मान, सन्मान, न्याय, हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे, नियुक्तीपत्रात म्हटले आहे. अर्जुन नायक यांच्या नियुक्तीबद्दल समाजाच्या सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## लोणीकर परिवारासह अनेकांना स्व.मुंडे यांचा राजकीय वारसा : राहुल लोणीकर

### पाष्टा पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**मंठा प्रतिनीधी**



लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या रूपाने संपूर्ण महाराष्ट्राला कणखर आणि भारतीय जनता पक्षाला नवसंजीवनी देणारा नेता लाभला होता मुंडे साहेबांच्या विचाराने व कार्य कुशल तेणे राज्यभरात भारतीय जनता पक्ष वाढीस लागला आज भारतीय जनता पक्षाला मिळालेले चांगले दिवस ही स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांची कृपा आहे आमच्या लोणीकर परिवारासह अनेकांना लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचा राजकीय वारसा लाभलेला असून मुंडे साहेबांमुळेच आम्ही राजकीय क्षेत्रात स्वतःचं नाव कमवू शकलो असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी केले.

जालना तालुक्यातील पाष्टा येथे मुंडे साहेबांच्या जयंती निमित्त लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी लोणीकर बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की, आजची भारतीय जनता पार्टी स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या तालमीत तयार झालेली असून वाण्याबाबदाचा पक्ष म्हणून हिणवणाऱ्या लोकांना स्वर्गीय मुंडे साहेबांनी भारतीय जनता पक्ष हा सर्वसामान्य माणसांचा पक्ष असल्याचे सिद्ध करून दाखवले. अनेक लोक स्वर्गीय मुंडे साहेब आणि त्यांचा वारसा जपणाऱ्या संघर्ष कन्या पंकजाताई मुंडे यांच्या बद्दल काही लोक वेगळी प्रेम दाखवून समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात एकीकडे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब आणि पंकजाताई मुंडे यांनी चालवलेला वसा आणि वारसा असणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या विरोधात भूमिका घेणारे लोक मुंडे साहेबांचे आम्ही एकच होऊ शकत नाहीत अशा लोकांनी लोणीकर कुटुंबाच मुंडे कुटुंबीयांसंदर्भातील प्रेम किती आहे याची पावती देण्याची गरज नाही असेही मुंडे कुटुंबीयांवर वेगळी प्रेम दाखवणाऱ्या लोकांना राहुल लोणीकर यांनी ठणकावून सांगितले. यावेळी युवा मोर्चाचे जालना जिल्हा सरचिटणीस विकास पालवे भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश सचिव जिजाबाई जाधव भाजपा किसान मोर्चाचे जालना जिल्हा अध्यक्ष माऊली शेजुळ पंचायत समिती सदस्य दत्तराव कांगणे भाजपा ओबीसी मोर्चा मंठा तालुकाध्यक्ष रामकिसन बोडके व विक्रम उफाड दिलीप जोशी गणेश मोरे दिलीप पवार आसाराम खरात रामेश्वर काकडे प्रकाश महाराज इलग विनोद राठोड अरुण सदावर्ते, सरपंच स्वरूप सानप, प्रभाकर गाढवे, गजानन महाजन, जयंत किनगावकर, नंदकुमार घोडे, कृष्णा केंद्रे, संतोष काळे, ज्ञानेश्वर घुगे, विजय मुंडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## होमी भाभा परिक्षेत विवेकानंद इंग्लिश स्कूल व विवेकानंद पब्लिक स्कूलचे यश

**परतूर प्रतिनिधी**

३० नोव्हेंबर रोजी घेण्यात आलेल्या होमी भाभा परिक्षेत विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यशाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी इ. ०९ वी व ०६ चे अनुक्रमे १९ विद्यार्थी, १९ विद्यार्थी पास झाले असून ०९ वी तून कु. शरयू चंद्रशेखर भांडवलकर तर इ. ०६ वी तून कु. आदित्री प्रमोद आकात व चि. हर्ष जगन्नाथ बागल यांची पुढील प्रात्यक्षिक फेरी साठी निवड झाली आहे. तसेच विवेकानंद पब्लिक स्कूल परतुर ची इ. ०६ वी विद्यार्थीनी कु. इश्वरी गणेश उबाळे ही विद्यार्थिनी पास झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था अध्यक्ष डॉ. एस. जी. बाहेकर यांनी केले तर शालेय समिती अध्यक्ष श्री. संदीप दादा बाहेकर यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




## आ. संतोष दानवेंना वाढदिवसनिमीत्त शुभेच्छांच्याचा वर्षावात

### मान्यावरांनी दिल्या शुभेच्छा, विविध समाजसेवी उपक्रमांचे आयोजन

**भोकरदन प्रतिनीधी:**

भोकरदन-जाफराबाद विधानसभा मतदारसंघाचे आ. संतोष दानवे यांचा वाढदिवस रविवार (१५) रोजी शुभेच्छांच्या वर्षावात साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मोरेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व घोडके हॉस्पीटल यांच्या संयुक्त



विद्यमाने आमदार संतोष दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त संभाजीनगर बॅलेसेमिया सोसायटीचे छत्रपती संभाजीनगर येथील श्री सत्यसाई रक्त केंद्राच्यावतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचे उदघाटन आ. संतोष दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान

शिबीरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान डोंगरे, उपप्राचार्य डॉ. गोवर्धन मुळक, सजन कचरे, डॉ. निखील घोडके, प्रभाकर घोडके यांच्यासह इतरांनी रक्तदान केले. रक्त दान भोकरदन भोकरदनचे आ. संतोष दानवे यांच्या वाढदिवसानिमीत्त आयोजित रक्तदान शिबिराचे उदघाटन करताना आ. संतोष दानवे दुसऱ्या छायाचित्रात भाजपा जिल्हाउपाध्यक्ष मुकेश चिने यांच्या नेतृत्वात आ. संतोष दानवे यांच्या हस्ते ब्लँकेट वाटप करण्यात आले. शिबीर यशस्वीतेसाठी डॉ. वेदश्री निखिल घोडके, प्रभाकर घोडके, सत्यसाई रक्तकेंद्राचे डॉ. महेंद्रसिंह चौव्हान यांनी परिश्रम घेतले.

जाहीरात व
बातम्यांसाठी संपर्क
+91 97635 21855



बुधवार, दि. 18 ते 24 डिसेंबर 2024

सा. बीड गदर
नि:पक्षपाती लेखणीचा कणखर बाणा

संपादक : ज्ञानेश्वर लंगे मो. 9763521855

### आमची ताकद आम्ही दाखवून देऊ,

मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. मंत्रिमंडळ विस्ताराच्या दुसऱ्याच दिवशी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिला आहे. मंत्र्यांचा शपथविधी झाला, आता पत्रकार परिषद घेऊन आमरण उपोषणाची २५ जानेवारी तारीख सांगीतली. ज्यांना स्वतःच्या मनाने सामूहिक आमरण उपोषणाला बसायचं, त्यांनाच उपोषणाला बसवलं जाईल, उपोषणाला बसण्यासाठी कोणावरही बंधन घातलं जाणार नाही. आमरण उपोषणाला कोणी नाही जरी बसलं, तरी मी एकटाच बसणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केले आहे. मी जर उपोषणाला बसा म्हटलं तर घराघरांमधून मराठे उपोषणाला बसतील, आमची ताकद आम्ही दाखवून देऊ, अशा इशाराही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

# माझा शेवटही होऊ शकतो..!

## कुटुंबाला सांगतो, मी नसलो तरी समाजासाठी योगदान द्या..

## मराठा योद्धा मनोज जरांगे पाटलांची पुन्हा आमरण उपोषणाची घोषणा

## मराठा आरक्षणाचा लढा कधीही बंद करू नका हे समाजाला आवाहन

अंतरवलीसराटी: अशोक निपटे

**मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा उपोषणाला बसणार आहेत. या उपोषणातून मी माघार घेणार नाही असे सांगतानाच ते म्हणाले की, मला उपोषण आता सहन होत नाही. मी महाराष्ट्राचे दौरे करून आलो तर मला ४ दिवस आराम करावा लागला. सलाईन घ्यावे लागले. माझे खूप हाल आहेत. शरीराला वेदना आहे. शरीर साथ देत नाही. पहिले मी ८-१५ दिवस उपोषण करू शकत होतो. आता दुसऱ्या तिसऱ्या दिवशीही हाल होणार आहेत. मला आत्ताच उठता बसता येत नाही. त्यामुळे मला प्रचंड वेदना आहेत. तरीही मी मागे हटणार नाही. सरकारने वेळीच मागणी मान्य केली नाही तर उपोषणाने माझा शेवटही होऊ शकतो. माझ्या नंतर माझा मराठा समाज सांभाळा. कुटुंबाला सांगतो, मी नसलो तरी समाजासाठी योगदान द्या. लढा कधीही बंद करू नका हे समाजाला आवाहन आहे. असे आवाहन मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केले. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.**

२५ जानेवारी २०२५ ला तुफान ताकदीने घराघरातील मराठ्यांनी अंतरवालीला या. नोकरदार, शेतकरी सर्वांनी मराठ्यांच्या लेकरासाठी एकजूट होऊन अंतरवालीत यावे. मराठा समाजाच्या बैठका सुरू करा. कुणीही घरात राहू नका. राज्यभरातील कानकोपऱ्यातील मराठ्यांनी लेकराबाळासह अंतरवालीत यावं. मराठ्यांचे भगवं वादळ उसळू द्या असं आवाहन मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी करत पुन्हा एकदा आमरण उपोषणाची घोषणा केली आहे.

अंतरवालीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत मनोज जरांगे पाटील म्हणाले की, २५ जानेवारीला एकानेही लग्नाची तारीख धरू नये. सगळा मराठा समाज अंतरवालीकडे येणार आहे. त्याच ताकदीने मराठा वादळ उसळणार आहे. २५ जानेवारीला माझं आमरण उपोषण सुरू होणार आहे. २४ जानेवारीलाच रात्री गोरगरिब मराठा समाज इथं जमणार आहे. त्यामुळे २५ जानेवारी २०२५ च्या आत मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य करा. मागण्या मान्य केल्या नाही तर तुम्हाला गुडघे टेकायला लावणार. २५ जानेवारीपर्यंत आरक्षण दिले नाही, मराठा समाजाची तुम्ही बेईमानी केली तर तुम्हाला सोडणार नाही असा इशारा त्यांनी सरकारला दिला.तसेच तुमची मध्यस्थी असो किंवा अन्य काही आम्ही ऐकून घेणार नाही. सगेसोयरे यांच्या अधिसूचनेला २६ जानेवारीला एक वर्ष पूर्ण होतंय अद्याप त्याची अंमलबजावणी केली नाही. गॅझेट लागू केले नाहीत. सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्रे दिले नाहीत. मराठा-कुणबी एकच हा देखील अध्यादेश काढला नाही. त्यामुळे २५ जानेवारीपासून उपोषणाला सुरूवात करतोय. मराठा समाजाने २५ जानेवारीपर्यंत सगळी कामे आटपून घ्यावीत. जितके दिवस आपल्याला बसावे लागेल तितके आपण बसूया असंही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान, मराठा आरक्षण घेईपर्यंत अंतरवालीतून उठायचं नाही. मराठा समाजाचे जे लोक इथं अंतरवालीत येणार त्यांनी येताना ज्या ज्या गोष्टी लागतात त्या घेऊन या. अंथरूण पांघरूण घ्या. कितीही श्रीमंत असला आणि कितीही गरीब असला तरी हॉटेलवर जायचे नाही. जेवायला जायचं नाही. पाण्याची व्यवस्था करून घ्यायची. गोरगरिबाच्या लढ्यात सामील व्हायचं. जेवण इथं स्वत:चं करायचं. ज्यांना उपोषण करायचं त्यांनी करा. ज्यांना नाही करायचं त्यांनी पाठिंबा द्यायला या असंही मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.



### मराठा आरक्षण घेणार सरकारला वाकवणार : मराठा आंदोलक मनोज जरांगे

पाटील मंगळवारी मोठी घोषणा केली आहे. आज जरांगे पाटील यांनी नियोजित सामूहिक आमरण उपोषणाची तारीख जाहीर केली असून राज्यातील मराठा समाजातील लोकांनी आंतरवली सराटीत जमण्याचे आवाहन केले आहे. नवीन सरकार स्थापन होताच पुन्हा मराठा आरक्षणाची लढाई सुरु करणार असल्याचे मनोज जरांगे यांनी याआधीच सांगितले होते. त्यानुसार त्यांनी २५ जानेवारी पासून आमरण उपोषण सुरु करणार असल्याचे जाहीर केले आहे.

### गावागावात जरांगे पाटलाचीच हवा

मराठा समाजासाठी निस्वार्थपणे झटणारा नेता मनोज जरंगे पाटील यांच्या पाठीमागे मराठा समाज खंबीरपणे उभा आहे. मनोज जरंगे पाटील यांनी निवडणुकीत सहभाग घेतला नव्हता त्यांनी कधीही कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा दिला नाही. कोणत्याही उमेदवाराचे नाव घेतलं नाही. त्यामुळे या निवडणुकीत ते अलिप्त होते. जरांगे पाटील यांच्या पाठीमागेच मराठा समाज खंबीरपणे उभा आहे. जरांगे पाटील यांनी उपोषणाची घोषणा करतात गावागावात संपूर्ण समाजाच्या वतीने त्यांना पाठिंबा मिळत आहे. जरांगे पाटील जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल असे मराठा समाजाच्या वतीने सांगण्यात येत आहे.


### जगातील सर्वात मोठे सामूहिक आमरण उपोषण : सौ. कुंदाताई काळे



अंतरवाली सराटी येथे जगामध्ये आतापर्यंत कधीही झाले नाही असे जगातील सर्वात मोठे सामूहिक आमरण उपोषण येत्या २५ जानेवारीपासून होत आहे. या सामुदायिक अमरण उपोषणाला महाराष्ट्रातील सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सहकारी मराठा भगिनी सौ. कुंदाताई काळे पाटील यांनी केले आहे. सौ. कुंदा ताई यांनी सांगितले की, मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी जीवाची बाजी लावणारे आमचे दैवत मनोज दादा जरांगे पाटील यांना सर्व समाजाचा, मराठ्यांचा पाठिंबा आहे. मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सामुदायिक उपोषणा मध्ये मराठा माता-भगिनी, बांधव बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातून अंतरवाली सराटीकडे येणार आहेत. यासाठी प्रत्येक तालुक्यात, जिल्ह्यात, महाराष्ट्रातील प्रत्येक भागात गावागावात समाजसेवक जे आहेत त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन मीटिंग लावणे, सर्वांना आवाहन करणे आवश्यक आहे. मराठा आरक्षण महत्त्वाचे आहे. पुढच्या भविष्यासाठी, बाळांसाठी.. या सामुदायिक उपोषणासाठी माझ्या सारख्या लाखो भगिनींनी पाठिंबा दिला आहे. सर्व माता-भगिनी मराठा समाज एकाजुटीने, एका विचाराने मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या पाठीशी आहेत.सर्वजण सामुदायिक उपोषणाला मोठ्या संख्येने आंतरवाली सराटीकडे येणार आहेत. असे बीडच्या सामाजिक कार्यकर्त्या सौ. कुंदाताई शामसुंदर काळे पाटील यांनी सांगितले.

### मनोज दादांनी उपोषण करू नये मनीषाताई मराठे यांची मागणी

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची तब्येत चांगली नाही त्यामुळे त्यांनी यापुढे उपोषण करू नये अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांच्या सहकारी भगिनी मनीषाताई मराठे यांनी केली आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, अंतरवाली सराटी या ठिकाणी जाऊन मराठा योद्धा मनोज जरांगे दादांची मी भेट घेऊन मस्साजोग येथील संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी पुढील काही गोष्टीवर चर्चा केली व एक बहीण म्हणून दादांनी उपोषण करू नये अशी मागणी मी केली. कारण मनोज दादासारखे निस्वार्थ व्यक्तिमत्व समाजाला खूप वर्षांनी मिळाले आहे त्यामुळे मनोज दादा सारखा व्यक्ती समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक आहे उपोषणामुळे अगोदरच दादांची तब्येत खूप खराब झालेली आहे त्यामुळे दादांनी दुसऱ्या मार्गे आरक्षणाचा लढा लढावा असं माझं मत आहे. तरी मनोज दादा जो निर्णय घेतील त्यांच्यासोबत कायम असणार असे मनीषाताई मराठे यांनी सांगितले.



### मी मरायला खंबीर आहे...

महाराष्ट्रातील मराठा ओसमाजाने माझ्या पाठीमागे खंबीर साथ दिली आहे त्यामुळेच हे आंदोलन आपण योग्य पद्धतीने करू शकलो की साथ माझ्या पाठीमागे अशीच राहू द्या. घरच्यांच्या विरोधात जाऊन उपोषण करू नका. मी तुमच्यासाठी उपोषण करायला आणि वेळप्रसंगी मरायलाही खंबीर आहे असेही जरांगे पाटील यांनी सांगितले.

### समाजाच्या अपेक्षा भंग होऊ देणार नाही

महाराष्ट्रातील मराठा समाजाने मला त्यांचं लेकरु मानलं आहे. मी ही समाजाला मायबाप मानलं आहे. माझ्यावर समाजाचा विश्वास आहे. याची मला जाणीव आहे. हा विश्वास मी कधीच तुटून देणार नाही. समाजाचा कधीच अपेक्षाभंग होऊ देणार नाही. मी कधीच गद्दारी करणार नाही. कधी मॅनेज होणार नाही. हा माझा शब्द आहे. असंही मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

### सरकारने उपोषण करण्याची वेळ येऊ देऊ नये : ॲड राज पाटील

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाच्या न्याय मागणीसाठी 25 जानेवारीपासून उपोषणाला बसणार आहेत. मागणी मान्य नाही झाली तर ते माघार घेणार नाहीत जीव देण्याची तयारी त्यांनी ठेवली आहे. सरकारने वेळेवर भानावर येऊन त्यांची मागणी मान्य करावी आणि त्यांना उपोषण करण्याची वेळच येऊ देऊ नये. अन्यथा सरकारला हे आंदोलन खूप जड जाईल. असे मत मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी तथा लढा दुष्काळाशी फाऊंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांनी व्यक्त केले आहे.